**शासकीय उच्च अधिकाऱ्यांच्या दालनात**
**<u>वातानुकूलीत यंत्रे बसविण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय, क्र.शाकाजा-१०२२/प्र.क्र.१३/२२,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ मे, २०२२

**<u>संदर्भ</u>** :- १) शासन परिपत्रक क्र.शाकाजा-१०९१/प्र.क्र.७२/२२, दि.६ जून,१९९१.
२) शासन निर्णय क्र.शाकाजा-१०१२/प्र.क्र.२/२०१२/२२,दि.२७ फेब्रुवारी,२०१२

**<u>प्रस्तावना:-</u>**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ च्या परिपत्रकाद्वारे राज्यातील जे शासकीय अधिकारी रु.१८४००/- किंवा त्यापेक्षा अधिक किमान वेतन आहे अशा वेतनश्रेणीत काम करतात त्यांची दालने वातानुकूलीत करण्यास मंजुरी देण्यात आली. तद्नंतर सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचने नुसार या विभागाच्या संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जे शासकीय अधिकारी वेतन बँड रु.३७४००-६७००० ग्रेड वेतन रु.१०,०००- किंवा त्यापेक्षा अधिक वेतन बँड + ग्रेड वेतनमध्ये काम करतात त्यांची दालने वातानुकूलीत करण्यास अनुज्ञयता देण्यात आली. आता ७ व्या वेतन आयोगानुसार ज्या उच्च अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी वेतन स्तर S-३०:१४४२००-२१८२०० व त्यापेक्षा अधिक आहे अशा उच्च अधिकाऱ्यांना त्यांच्या दालनात वातानुकूलीत यंत्रे बसविण्याची सुविधा अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**<u>शासन निर्णय:-</u>**

१. सातव्या वेतन आयोगानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन)नियम २०१९ नुसार राज्यातील जे शासकीय अधिकारी सुधारित वेतनश्रेणी मधील वेतन स्तर S-३०: १४४२००-२१८२०० किंवा त्यापेक्षा अधिक वेतनस्तरा मध्ये काम करतात त्यांची दालने वातानुकूलीत करता येतील असा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. या बाबीवर होणारा खर्च संबंधीत विभागाने त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपाचारिक संदर्भ क्र.१६९/विनियम,

दि. ०६.५.२०२२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२२०५२५१२४५२१७१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUVARNA
GANESH GAWDE

Digitally signed by SUVARNA GANESH GAWDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef7c7aa7d7ef166d903fa3f2e19630176b5aef86edf82a7744d898d27468 1eeb, pseudonym=EFFC2A085C4346EF93DD68333741DFA82FED5991, serialNumber=07C579538500B8975CCC3AD7E231B775BF3CCCF9649AB7E299C D82DCBE6A25C8, cn=SUVARNA GANESH GAWDE
Date: 2022.05.25 12:47:59 +05'30'

**(सु.ग.गावडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
५) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती), मंत्रालय मुंबई-३२
६) वित्त विभाग (का.विनियम), मंत्रालय, मुंबई-३२
७) कार्यकारी अभियंता, बांधकाम भवन, २५ मर्झबान पात्रावाला रोड, फोर्ट, मुंबई-४०० ०१
८) उप अभियंता,(सा.बां.) विभाग, दक्षिण उप विभाग,एम.टी.डी.सी.कार्यालयासमोर, मुंबई-३२
९) शाखा अभियंता, सा.बा.वि., मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) निवडनस्ती.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner